K.T.S.P.Mandal's

Hutatma Rajguru Mahavidyalaya, Rajgurunagar.

Department of Economics

HOD – Dr.R.S.Shirasi

Class:- S.Y.B.Com (code 243)

Subject:- Business Economics (Macro)

व्यावसायिक अर्थशास्त्र (स्थूल)Sem IV

Sub Teacher - Assi.Prof.Dhanapune S.V.

HRM BUS.ECONOMICS SYBCOM

घटक :- Unit No 2 चलनविस्तार

उपघटक :- चलनविस्तार: अर्थ आणि व्याख्या

चलनविस्ताराची कारणे, परिणाम

मागणी-ताणनिर्मित चलनविस्तार आणि खर्चदाबनिर्मित

चलनविस्तार, चलनविस्ताराचे नियंत्रण

Topic No 2

चलनविस्तार

INFLATION

2.1 चलनविस्तार: अर्थ आणि व्याख्या

(Inflation : Meaning and Definition)

2.2 चलनविस्ताराची कारणे (Causes of Inflation)

2.3 चलनविस्ताराचे परिणाम (Consequences of Inflation)

2.4 मागणी-ताणनिर्मित चलनविस्तार आणि खर्चदाबनिर्मित चलनविस्तार (Demand Pull Inflation and Cost Push Inflation)

2.5 चलनविस्ताराचे नियंत्रण (Control of Inflation)

2.6 मंदीयुक्त चलन अतिवृद्धी : अर्थ आणि कारणे

(Stagflation : Meaning and Causes)

HRM BUS.ECONOMICS SYBCOM

2.1 चलनविस्तार

INFLATION

प्रास्ताविक

भाववाढ ही जागतिक घटना बनलेली आहे. जगातील असा एकही देश नाही की, ज्याला चलनविस्ताराचे चटके बसले नाहीत. त्यामुळे जगातील अर्थशास्त्रज्ञांचे लक्ष मोठ्या प्रमाणावर चलनविस्ताराने आकर्षित करून घेतले आहे. विशेषतः भांडवलशाही देशाच्या बाबतीत ही समस्या अधिक गंभीर असते. सन 1929 ते 1934 च्या जागतिक महामंदीनंतर चलनविस्तार हीच ऐरणीवरची समस्या बनलेली आहे. चलनविस्ताराला आर्थिक तेजी/मुद्रास्फिती/चलनवृद्धी/किंमतवाढ किंवा भाववाढ इत्यादी पर्यायी शब्द वापरले जातात. कागदी. चलनाचा स्वीकार केल्यापासून चलनविस्ताराची समस्या अधिक तीव्र झालेली आहे.

चलनविस्तार : अर्थ आणि व्याख्या

MEANING AND DEFINITION

HRM BUS.ECONOMICS SYBCOM

चलनविस्तारात वस्तू आणि सेवा यांच्या किमती सातत्याने व दीर्घकाळ वाढतात. त्यामुळेच या अवस्थेला 'भाववाढ' असेही म्हटले जाते. किमती वाढत असताना जेव्हा त्या समतोल पातळीपेक्षाही अधिक वेगाने वाढू लागतात तेव्हा चलनविस्तार अस्तित्वात येतो. चलन किंवा पैशाच्या पुरवठ्याचा अतिरेक हे चलनविस्ताराचे एक महत्त्वाचे कारण आहे.

चलनविस्ताराच्या अनेक अर्थशास्त्रज्ञांनी व्याख्या केल्या आहेत, त्यातील काही निवडक व्याख्या पुढीलप्रमाणे :

चलनविस्तार - व्याख्या :

- **“चलनविस्तार अशी स्थिती आहे की, त्यामध्ये पैशाचे मूल्य घटते आणि किंमतपातळीत वाढ होते.”**

  क्राऊथर

- **"Inflation is a state in which the value of money is falling i.e. prices are rising." " - Crowther**

- **"खूप जास्त पैशाने खूप कमी वस्तूंचा पाठलाग करणे म्हणजे चलनविस्तार होय.”**

  - कोलबर्न

- **"Inflation is too much money chasing too few goods."**

- **"जेव्हा पैशातील उत्पन्न हे उत्पन्नवाढीच्या प्रक्रियेपेक्षा अधिक वेगाने वाढते तेव्हा चलनविस्तार निर्माण होतो." - प्रा. पिगू**

- **"जेव्हा अर्थव्यवस्थेत वस्तू आणि सेवांच्या मूल्याच्या तुलनेने पैशाची संख्या अधिक होते तेव्हा चलनविस्तार निर्माण होतो." - केमरर**

HRM BUS.ECONOMICS SYBCOM

- **"जेव्हा अर्थव्यवस्थेत स्थिर आणि टिकाऊ स्वरूपाची किमतीतील वाढ घडून येते त्यालाच चलनविस्तार असे म्हणतात.”** **- फ्रिडमन**

चलनविस्ताराच्या वर सांगितलेल्या व्याख्या चलनविस्तार ही संकल्पना एक चलनी घटना आहे याच्याशी निगडित आहे. परंतु प्रा. केन्स यांनी चलनविस्तार संकल्पना पूर्ण रोजगार संकल्पनेशी जोडली आहे. त्यांच्या मते, किंमतपातळीमधील चलनविस्तार वाढ ही पूर्ण रोजगार पातळीपूर्वी निर्माण होत नाही. जोपर्यंत अर्थव्यवस्थेत उत्पादनाची साधने बेकार असतात तोपर्यंत पैशाच्या पुरवठ्यातील विस्तार किंमतपातळीमधील वाढीत परावर्तित होत नाही. पूर्ण रोजगार पातळी गाठल्यानंतर किंमतपातळीत वाढ होऊ लागते. पूर्ण रोजगार पातळीपूर्वी पैशाच्या पुरवठ्यातील वाढीमुळे उत्पादन आणि रोजगार पातळीत वाढ होते; परंतु किंमतपातळीत वाढ होत नाही. पूर्ण रोजगार पातळीनंतरदेखील पैशाच्या पुरवठ्यातील वाढ चालू राहत असेल तरच किंमतपातळीत वाढ होते.

प्रा. केन्स यांच्या मते, "पूर्ण रोजगार पातळीनंतर किंमतपातळीत होणारी वाढ म्हणजे खरा चलनविस्तार होय."

अर्थव्यवस्थेत उत्पादनातील वाढीमुळे पूर्ण रोजगार पातळीपूर्वी जर काही अडथळे असतील तर किंमतपातळीत वाढ होऊ शकते.

HRM BUS.ECONOMICS SYBCOM

परंतु किमतीतील या वाढीला खरा चलनविस्तार म्हणता येणार नाही. केन्स या भाववाढीला अर्थ-चलनविस्तार (Semi Inflation) किंवा पूर्ण रोजगार पातळीपूर्वीची भाववाढ असे म्हणतात.

पॉल इन्झिग (Paul Einzig) म्हणतात की, "चलनविस्तार अशी एक असंतुलित अवस्था होय की, ज्या अवस्थेत खरेदीशक्तीचा विस्तार झाल्याने किमती वाढतात किंवा वस्तूंच्या किमती वाढल्यामुळे खरेदीशक्तीचा (पैसा) विस्तार होतो."

ॲक्ले यांच्या मते, "चलनविस्तारात सर्वसाधारण किंवा सरासरी किमतीत सातत्याने आणि लक्षणीय वाढ होते."

"A persistent and appreicaible rise in the general level or average of price."

2.2 चलनविस्ताराची कारणे

CAUSES OF INFLATION

अर्थव्यवस्थेत घडून येणारी भाववाढ किंवा चलनविस्तार वेगवेगळ्या कारणांनी संभवतो. विशेषतः अर्थव्यवस्थेत मागणीमध्ये होणारी अतिरिक्त वाढ ही चलनविस्ताराला जबाबदार असते.

मागणीचे पुरवठ्यावरील आधिक्य दोन कारणांनी संभवते :

HRM BUS.ECONOMICS SYBCOM

(1) वस्तू आणि सेवांच्या मागणीत होणारी वाढ

(2) वस्तू आणि सेवांच्या पुरवठ्यात होणारी घट.

वस्तू आणि सेवांच्या मागणीत होणारी वाढ (Increasing Demand for Goods and Services) : केन्सवादी आणि पैसावादी अर्थशास्त्रज्ञ चलनविस्ताराला मागणीतील वाढ हाच घटक प्रामुख्याने जबाबदार असतो असे मानतात.

1.मागणीच्या परिमाणातील वाढीला पुढील घटक जबाबदार असतात :

(अ) सार्वजनिक खर्चातील वाढ (Increase in Public Expenditure) : देशामध्ये युद्धजन्य परिस्थिती निर्माण होत असेल किंवा विकासात्मक नियोजन प्रभावीपणे

राबविण्याचा प्रयत्न केला जात असेल तर सार्वजनिक खर्चात किंवा सरकारच्या खर्चात मोठी वाढ होते. त्यामुळे अर्थव्यवस्थेतील वस्तू आणि सेवांच्या मागणीत मोठी वाढ होते. परिणामतः त्यामधून चलनविस्ताराला चालना मिळते.

(ब) खाजगी खर्चातील वाढ (Increase in Private Expenditure) खाजगी उपभोग किंवा गुंतवणूक खर्चातील वाढीमुळे अर्थव्यवस्थेत एकूण मागणी अतिरिक्त होत असते. जोपर्यंत व्यावसायिक स्थिती चांगली असते तोपर्यंत खाजगी उद्योजक अधिकाधिक प्रमाणात निधीची गुंतवणूक नवीन व्यवसायात करतात. त्यामूधन उत्पादन घटकाच्या सेवांना अधिक मागणी येऊ लागते. त्यामुळे घटक किमतीमध्ये वाढ होते. घटक किमतीमधील वाढीमुळे घटक मालकाच्या उत्पन्नामध्ये वाढ होते. परिणामतः वस्तूवरील उपभोग खर्चात वाढ होते. खाजगी खर्चातील वाढीमुळे वस्तूंची मागणी तर वाढतेच; परंतु त्याचबरोबर उत्पादन घटकाची मागणीही वाढत असते.

, **(क) निर्यातीमधील वाढ (Increase in Exports) :** देशी वस्तूंना विदेशामध्ये अधिक मागणी निर्माण होऊ लागली की. देशांतर्गत उपभोगासाठी उपलब्ध होऊ शकणारा वस्तूंचा साठा कमी होतो. जेव्हा देशामधून परदेशात मोठ्या प्रमाणात वस्तूंची निर्यात केली जाते तेव्हा देशांतर्गत उपभोगासाठी वस्तूंची उपलब्धता कमी-कमी होत जाते. साहजिकच, त्यामधून अर्थव्यवस्थेतील अंतर्गत वस्तूंची टंचाई निर्माण होते. त्यामुळे अर्थव्यवस्थेत भाववाढ घडून येते.

HRM BUS.ECONOMICS SYBCOM

(ड) लोकसंख्येतील वाढ (Rapid Growth of Population) : लोकसंख्येत वेगाने वाढ होत असेल तर परिणामस्वरूप अर्थव्यवस्थेतील वस्तू आणि सेवांची एकूण परिणामकारक मागणीची पातळी वाढते. त्यामुळे वस्तू आणि सेवांच्या किमती वरच्या पातळीवर जातात.

(इ) करांमधील घट (Reduction is Taxation) : सरकारने देऊ केलेली करांमधील कपातदेखील अर्थव्यवस्थेतील वस्तू आणि सेवांच्या अतिरिक्त मागणीचे एक महत्त्वाचे कारण आहे. जेव्हा सरकार कराच्या दरामध्ये घट करते किंवा काही कर रद्द करते तेव्हा लोकांचे खर्चशक्य उत्पन्न वाढते किंवा त्यांच्या खरेदीशक्तीत वाढ होते. वाढीव खरेदीशक्तीमुळे लोकांचा वस्तू आणि सेवांवरील उपभोग खर्च वाढतो.

(ई) अंतर्गत कर्जाची परतफेड (Repayment of Internal Debts) : जेव्हा सरकार पूर्वी घेतलेल्या कर्जाची लोकांना परतफेड करते तेव्हा लोकांच्या खरेदीशक्तीत वाढ होते. या वाढीव खरेदीशक्तीचा उपयोग लोक उपभोग्य वस्तू व सेवा खरेदी करण्यासाठी करतात. त्यामुळे अर्थव्यवस्थेतील एकूण मागणी नैसर्गिकपणे वाढते.

सरकार तुटीच्या अर्थभरणाचा आधार घेत असते. लोकांकडून कर्ज घेऊन किंवा मोठ्या प्रमाणावर नवीन नोटा छापून सरकार तुटीचा अर्थभरणा करते. त्यामुळे वस्तू व सेवांच्या एकूण पुरवठ्याच्या तुलनेने एकूण मागणीचे परिमाण अधिक होऊन चलनविस्तारकारक परिस्थिती निर्माण होते.

(उ) काळा पैसा (Black Money): अर्थव्यवस्थेत प्रचंड प्रमाणावर निर्माण झालेला पैसादेखील मागणीमध्ये वाढ करण्यास जबाबदार असतो. विनाकष्टाने मिळालेला हा काळा

HRM BUS.ECONOMICS SYBCOM

पैसा सहजपणे, उधळपट्टीने खर्च करतात. लग्न समारंभ, इमारतीची बांधकामे आणि चैनीच्या वस्तूंची मागणी अधिक प्रमाणात काळया पैशातूनच होत असते.

(ऊ) एकूण स्वस्त पैसा धोरण (Cheap Money Policy) : देशाची मध्यवर्ती बँक जेव्हा स्वस्त पैशाचे धोरण अंगीकारते तेव्हा व्यापारी बँकांकडून अधिक प्रमाणात पतविस्तार केला जातो. म्हणजेच लोक व्यापारी बँकांकड़न अधिक प्रमाणात कर्ज घेतात आणि या कर्जाचा उपयोग वस्तू व सेवा खरेदी करण्यासाठीच केला जातो. परिणामस्वरूप अर्थव्यवस्थेतील मागणीची पातळी वाढून चलनविस्ताराची परिस्थिती निर्माण होते.

. (ए) उपभोक्त्यांच्या खर्चातील वाढ (Increase in Consumer's Spending) : जेव्हा उपभोक्त्यांच्या खर्चामध्ये वाढ होते तेव्हा उपभोक्त्यांच्या खर्चातील वाढ सुलभ पतधोरणामुळे किंवा पूर्वीची बचत बाहेर काढल्याने घडून येत असते.

HRM BUS.ECONOMICS SYBCOM

2.वस्तू आणि सेवांच्या पुरवठ्यात होणारी घट :

(Factors Causing a Decrease in Supply) : पुढील घटकांमुळे वस्तू व सेवांच्या पुरवठ्यात घट घडून येत असते.



(अ) उत्पादन घटकांची दुर्मीळता (Shortage of Supplies of Factors of Production) : कधी कधी श्रम, भांडवल, यंत्रे, कच्चा माल यांसारख्या घटकांचा अर्थव्यवस्थेत तुटवडा निर्माण होत असतो. घटकांच्या टंचाईमुळे वस्तू आणि सेवांचे उत्पादन कमी होते. उपभोग्य वस्तूंची दुर्मीळता वाढते. त्यामुळे अर्थव्यवस्थेत भाववाढीची परिस्थिती निर्माण होते. देशामध्ये उत्पादनवाढीच्या प्रयत्नांमध्ये उत्पादन घटकांची दुर्मीळता हा एक महत्त्वाचा अडथळा आहे.

(ब) नैसर्गिक संकटे (Natural Calamities) : महापूर, भूकंप आणि अवर्षण यांसारख्या नैसर्गिक संकटामुळे शेती उत्पादनावर अतिशय प्रतिकूल परिणाम होतो. शेती उत्पादनातील घटीमुळे काही औद्योगिक उत्पादनामध्येदेखील घट होते. त्यामुळे अर्थव्यवस्थेत भाववाढ दबावात्मक परिस्थिती निर्माण होते.

(क) औद्योगिक कलह (Industrial Disputes) : ज्या देशांमध्ये औद्योगिक संघटना प्रबळ असतात त्या देशात कामगार संघटना भाववाढीला मदत करत असतात. बऱ्याचदा कामगार संघटना आपल्या प्रश्नांची सोडवणूक करण्यासाठी संपाचे हत्यार उगारत असतात. जर संप अयोग्य असेल आणि जर तो विनाकारण लांबविला जात असेल तर मालकवर्ग ताळेबंद जाहीर करतात. या दोघांचा परिणाम औद्योगिक उत्पादन घटीमध्ये होतो आणि आपोआपच बाजारपेठेतील वस्तूंचा पुरवठा कमी होऊन किंमतवाढीला चालना मिळते.

(ड) घटत्या उत्पादन फलाच्या नियमाची कार्यवाही (Operation of Law of Diminishing Returns) : ज्या देशातील उद्योगांमध्ये जुने व कालबाह्य यंत्रे आणि उत्पादन पद्धती यांचा वापर केला जातो तेथे घटत्या उत्पादन फलाच्या नियमाची कार्यवाही होते. त्यामुळे उत्पादनाच्या प्रतिनगाचा खर्च वाढून वस्तूंच्या किंमतवाढीला चालना मिळते.

(इ) एकांगी उत्पादन (Lop-Sided Production) : बऱ्याचदा अर्थव्यवस्थेत चैनीच्या वस्तू व आरामदायी वस्तूंच्या उत्पादनावर भर दिला जातो. त्यामुळे आपोआपच आवश्यक वस्तूंच्या उत्पादनाकडे दुर्लक्ष होते. म्हणून देशात आवश्यक उपभोग्य वस्तूंची टंचाई निर्माण होते.

HRM BUS.ECONOMICS SYBCOM

(ई) व्यापारीवर्गाकडून केली जाणारी साठेबाजी (Hoarding by Traders) : वस्तूंची टंचाई आणि किंमतवाढीच्या काळात मालाची साठेबाजी करण्याची वृत्ती व्यापारीवर्गात वाढत असते. त्यामुळे बाजारातील आवश्यक वस्तू गायब होतात. त्यांची टंचाई पुन्हा वाढते.

(उ) उपभोक्त्यांकडून केली जाणारी साठेबाजी (Hoarding by Consumers) : भाववाढीच्या काळात फक्त विक्रेते किंवा व्यापारीवर्गच मालाची साठेबाजी करतात असे नाही तर उपभोक्तेदेखील आवश्यक वस्तूंची भविष्यकाळातील भाववाढीच्या भीतीने साठेबाजी करीत असतात. त्यामुळे बाजारपेठेतील वस्तूंचा पुरवठा कमी होतो.

2.3 चलनविस्ताराचे परिणाम

CONSEQUENCES OF INFLATION

जोपर्यंत चलनविस्तार जास्तीचा रोजगार निर्माण करतो तोपर्यंत चलनविस्ताराचे वाईट परिणाम होत नाहीत.

अर्थव्यवस्थेत दीर्घकाळ चलनविस्तार टिकून राहत असेल तर समाज आर्थिक, राजकीय, सामाजिक आणि नैतिक दृष्टीने ढवळून निघत असतो.

HRMRUS.ECONOMICSSYBCOM

चलनविस्ताराचे परिणाम पुढील तीन भागांमधून स्पष्ट करता येतात :

(1) उत्पादनावरील परिणाम; (2) वितरणावरील परिणाम; (3) इतर परिणाम.



1. उत्पादनावरील परिणाम (Effects on Production) :

चलनविस्ताराचे अर्थव्यवस्थेतील उत्पादनावर खोलवर परिणाम होत असतात. चलनविस्तार अर्थव्यवस्थेत नेहमी उत्पादन क्रियेवर प्रतिकूल परिणाम करतोच असे नाही. मंद स्वरूपाचा चलनविस्तार अर्थव्यवस्थेला हितकारक असतो. जोपर्यंत देशात उत्पादनाचे काही घटक बेकार असतात तोपर्यंत असा चलनविस्तार उत्पादनवाढीला फायदेशीर असतो.

ज्या अर्थव्यवस्थेत उत्पादन साधनांचा अपूर्ण वापर झालेला असतो त्या अर्थव्यवस्थेत पैशाच्या पुरवठ्याचा विस्तार झाल्यास किमतीमध्ये हळूहळू वाढ होते. परंतु त्याच वेळेला किमतीच्या प्रमाणात उत्पादन खर्चात वाढ होत नाही. साहजिकच, त्यामुळे व्यावसायिक लोकांचा नफ्याचा गाळा वाढतो व अर्थव्यवस्थेत आशावादी वातावरण निर्माण होते. व्यावसायिक क्षेत्रातील अशा आशादायी वातावरणात व्यावसायिक उत्पादन क्रियांमधील त्यांची गुंतवणूक वाढवितात. अर्थव्यवस्थेत उत्पादन व रोजगारनिर्मिती होते. गुंतवणूक आणि रोजगारवाढीची ही क्रिया पूर्ण रोजगार पातळी प्रस्थापित होईपर्यंत चालू राहते. परंतु एकदा पूर्ण रोजगार पातळी गाठली आणि त्यानंतर पुढे पैशाच्या पुरवठ्यात झालेली कोणतीही वाढ अति-चलनवृद्धीमध्ये परावर्तित होते. म्हणून पूर्ण रोजगार पातळीपर्यंत पैशाच्या पुरवठ्यातील वाढ अर्थव्यवस्थेला अहितकारक नसते. म्हणून मंद स्वरूपाचा चलनविस्तार देशाच्या अर्थव्यवस्थेला एक प्रकारचा शक्तिवर्धक औषधासारखाच असतो. परंतु पूर्ण रोजगार पातळीनंतर पैशाच्या पुरवठ्यातील कोणतीही वाढ अर्थव्यवस्थेत अति चलनविस्ताराची परिस्थिती निर्माण करते. अति चलनविस्तार कोणत्याही अर्थव्यवस्थेला अहितकारकच असतो. तो व्यावसायिक जगतात अनिश्चिततेची परिस्थिती निर्माण करतो आणि ती उत्पादनासाठी अयोग्यच असते. अति चलनवृद्धी सुलभपणे कार्यान्वित असलेल्या अर्थव्यवस्थेत अडथळे निर्माण करते. **अशा चलनविस्ताराचे देशातील उत्पादन क्रियांवर पुढील प्रकारचे वाईट परिणाम होतात.**

(1) अति चलनविस्तार पैशाच्या मूल्यात लक्षणीय घट करतो. त्यामुळे लोकांकडून होणारी बचत कमी होते. कमी झालेल्या बचतीमुळे भांडवलनिर्मितीच्या प्रक्रियेवर अतिशय वाईट परिणाम होतो.

HRM BUS.ECONOMICS SYBCOM

(2) पैशाच्या मूल्यात लक्षणीय घट होत असेल तर त्यामुळे देशामधील पूर्वी झालेली परकीय गुंतवणूक काढून घेतली जाते.

(3) भांडवलनिर्मितीची प्रक्रिया घटल्याने गुंतवणूक पातळीवर प्रतिकूल परिणाम होतो. म्हणजेच गुंतवणूक पातळी कमी होते. गुंतवणूक पातळी घटली की उत्पादनाचे आकारमानही कमी होते.

(4) भांडवलनिर्मिती कमी झाल्याने उत्पादनाचे फक्त आकारमानच कमी होते असे नाही तर व्यावसायिकांच्या मनामध्ये भीती निर्माण होते. ते उत्पादनातील नवीन धोके स्वीकारण्यास तयार होत नाहीत.

(5) अति चलनवृद्धीच्या काळात उत्पादनाच्या रचनेतही बदल होतो. उत्पादनाचे घटक आवश्यक वस्तूंच्या उत्पादनाकडून चैनीच्या वस्तूंच्या उत्पादनाकडे वळविले जातात. त्यामुळे सामान्य माणसाला लागणाऱ्या उपभोग्य वस्तूंची अर्थव्यवस्थेत टंचाई निर्माण होते.

(6) बाजारपेठेतील अति चलनवृद्धीच्या परिस्थितीमुळे वस्तूंच्या दर्जावरही अतिशय वाईट परिणाम होतो. निकृष्ट प्रतीच्या वस्तू निर्माण करून विकण्याचा प्रयत्न अर्थव्यवस्थेत होतो. कारण अशा वस्तूंच्या उत्पादनातच अधिक नफा मिळत असतो.

HRM BUS.ECONOMICS SYBCOM

(7) चलनविस्तारामुळे व्यापारी तसेच उपभोक्तेही आवश्यक वस्तूंची साठेबाजी करतात. व्यापारीवर्ग अधिक नफ्याच्या हेतूने आवश्यक वस्तूंची साठेबाजी करून वस्तूंचा काळाबाजार करतात तर उपभोक्ते भविष्यात आवश्यक वस्तूंना द्याव्या लागणाऱ्या वाढीव किमतीच्या भीतीने साठेबाजी करतात. आवश्यक वस्तूंच्या उपभोगात निश्चितता यावी किंवा त्यामध्ये कोणताही अडथळा येऊ नये म्हणून उपभोक्ते आवश्यक वस्तूंची साठेबाजी करत असतात.

(8) चलनविस्ताराची अतिशय वाईट बाजू म्हणजे किंमतपातळीमधील सततच्या वाढीमुळे अनिश्चिततेची परिस्थिती निर्माण होते. त्यामुळे अर्थव्यवस्थेत सट्टेबाजीच्या क्रियांना वेग येतो. वाढीव उत्पादनातून वाढीव नफा मिळविण्यापेक्षा उत्पादकांना सट्टेबाजीच्या क्रियांमधून अधिक नफा मिळत असल्याने ते त्या क्रियांना अधिक महत्त्व देतात.

(9) चलनविस्तारामुळे अर्थव्यवस्थेतील किंमतयंत्रणेचे सुलभ तव्हेने चालणारे कार्य बिघडले जाते. त्यामुळे अर्थव्यवस्थेत सार्वत्रिक संशयाचे वातावरण निर्माण होते. (10) चलनविस्ताराच्या प्रभावाखाली अर्थव्यवस्थेची लवचीकता कमी होते. त्यामुळे अर्थव्यवस्थेतील उत्पादन साधनांची गतिशीलता कमी होते.

(11) चलनविस्ताराची आणखी एक वाईट बाजू म्हणजे देशी चलनाच्या सततच्या घटत्या मूल्यामुळे त्यावरील लोकांचा विश्वास उडतो. त्यामुळे लोक स्थिर मूल्य असलेले परकीय चलन खरेदी करतात की जेणेकरून त्यांच्या मालमत्तेचे मूल्य सुरक्षित राहील. म्हणून

HRM BUS.ECONOMICS SYBCOM

परकीय चलनबाजारात लोक देशी चलनाच्या बदल्यात परकीय चलन खरेदी करण्याची स्पर्धा करतात.

वर सांगितल्याप्रमाणे मंद चलनवृद्धी अर्थव्यवस्थेतील वापरात नसलेल्या साधनांच्या क्रियान्वयतेला हातभार लावते. तसेच अर्थव्यवस्थेतील विस्तार असलेल्या क्षेत्रात वास्तव साधनांचे स्थलांतर करते. नवनवीन प्रकल्पामध्ये गुंतवणूक करण्यासाठी संयोजकांना चलनातील वृद्धी उद्दीपित करत असते. त्यामुळे अर्थव्यवस्थेची उत्पादन करण्याची क्षमता वाढते व अंतिमतः अर्थव्यवस्थेतील एकूण उत्पादन वाढते. किंमतस्थैर्य याचा अर्थ, किंमत अलवचीकता असा होत नाही. जोपर्यंत अर्थव्यवस्थेतील सर्वसाधारण किंमतपातळी व वार्षिक तीन ते चार टक्के वाढ होत असेल तर किंमतस्थैर्य आहे असे मानले जाते. अशा किंमतवाढीचा अर्थव्यवस्थेला फायदाच होत असतो.

2. वितरणावरील परिणाम (Effects of Distribution) :

चलनविस्ताराचे उत्पन्न आणि संपत्तीच्या वितरणावर होणारे परिणामदेखील गंभीर स्वरूपाचे असतात. कारण चलनविस्ताराच्या काळात सर्वच घटकांच्या किमती सम प्रमाणात वाढत नाहीत. दीर्घकाळ टिकून राहणारा चलनविस्तार अर्थव्यवस्थेत समाजातील अधिक श्रीमंत लोकांच्या दृष्टीने उत्पन्नाच्या पुनर्वितरणाचा अनुकूल परिणाम घडवून आणतो. व्यावसायिकांचा उत्पन्नातील वाटा सुधारतो तर मजुरीच्या रूपाने उत्पन्न मिळविणाऱ्या लोकांचा उत्पन्नातील वाटा कमी होतो. वेगाने वाढणाऱ्या किमतीमुळे व्यावसायिक, व्यापारी आणि सट्टेबाजांचा अधिक फायदा होतो. कारण ज्या प्रमाणात

HRM BUS.ECONOMICS SYBCOM

उत्पादनाच्या किमती वाढतान त्या प्रमाणात उत्पादन-खर्चात वाढ होत नाही. या दोघांच्या वाढीत नेहमी कालांतर (Time-lag) पडते. किमती अगोदर वाढतात आणि काही काळाने उत्पादन खर्च वाढतो. त्यामुळे मधल्या काळात या लोकांच्या उत्पन्नात खूप मोठी वाढ घडून येते. व्यावसायिकांनी साठा करून ठेवलेल्या मालाच्या किमतीही वाढत असल्याने नफ्याचे प्रमाण वाढते. म्हणून चलनविस्ताराच्या काळात व्यावसायिक वर्गाचे उत्पन्न सर्व बाजूंनी वाढत असते. व्यावसायिक आणि उद्योजक यांच्यासारख्या लवचीक उत्पन्न असलेल्या लोकांचे उत्पन्न चलनविस्ताराच्या काळात खूप अधिक वाढते तर कामगार, पगारी नोकरवर्ग, शिक्षक, निवृत्ती वेतनधारक व्यक्ती यांचे चलनविस्ताराच्या काळात नुकसान होते. कारण ज्या वेगाने किमती वाढतात त्या वेगाने त्याचे उत्पन्न वाढत नाही. म्हणून त्यांचे वास्तव उत्पन्न कमी होते. चलनविस्तार नेहमीच अन्यायकारक असतो, तो प्रतिगामी करांसारखा आहे. ज्या वर्गाची ओझे सहन करण्याची क्षमता कमी असते अशाच वर्गाच्या खांद्यावर चलनविस्तार अधिक भार टाकत असतो.

समाजातील विविध वर्गांवर होणारे निश्चित परिणाम कसे असतील त्याचे विश्लेषण पुढीलप्रमाणे करता येईल.

(अ) धनको आणि ऋणको (Debtors and Creditors) : चलनविस्ताराच्या काळात सर्वसामान्यपणे कर्जदारांना लाभ होत असतो तर धनकोचे नुकसान होते. त्यांचे कारण म्हणजे ऋणको व्यक्ती जेव्हा कर्ज घेते तेव्हा पैशाची खरेदीशक्ती अधिक असते आणि तो जेव्हा कर्जाची परतफेड करतो तेव्हा पैशाची खरेदीशक्ती वाढणाऱ्या किमतीमुळे घटलेली असते. म्हणून ऋणको व्यक्ती जेव्हा कर्जाची परतफेड करते तेव्हा तो धनकोला कमी

HRM BUS ECONOMICS SYBCOM

खरेदीशक्ती परत करत असतो. त्यामुळे धनकोला त्याने दिलेल्या खरेदीशक्तीपेक्षा कमी खरेदीशक्ती मिळते.

(ब) पगारी नोकरवर्ग (Wage and Salary Earners) : चलनविस्ताराच्या काळात या वर्गाचे सर्वाधिक नुकसान होते. कारण किमती ज्या वेगाने वाढतात त्या वेगाने त्यांचे उत्पन्न वाढत नाही. तसेच उत्पन्नवाढ आणि जीवनमानाचा वाढणारा खर्च यांच्यामध्येही कालांतर पडते. जीवनमानाचा खर्च अगोदर वाढतो तर काही काळाने कामगारांचे उत्पन्न वाढते. त्यामुळे मधल्या काळात कामगारांना खूपच त्रास सहन करावा लागतो. ही कालांतराची शृंखला नियमित चालत असल्याने कामगारांना चलनविस्ताराच्या काळात नियमित त्रास होत असतो. जर कामगार त्यांच्या संघटनांमार्फत प्रबळपणे संघटित झालेले असतील तर त्यांचा चलनविस्ताराचा त्रास कमी होतो. परंतु जर का ते असंघटित असतील तर त्यांच्या त्रासामध्ये अधिकच भर पडते.

(क) स्थिर उत्पन्न मिळविणारा वर्ग (Fixed Income Group) : या वर्गाचे उत्पन्न स्थिर असल्याने चलनविस्ताराचा सर्वाधिक चटका त्यांनाच बसत असतो. पूर्वीच्या बचतीवर जीवन जगणारे निवृत्त कर्मचारी, व्याज व भाडेरूपाने उत्पन्न मिळविणारे लोक या वर्गात मोडतात. प्रचलित उत्पन्नात हे लोक कसेतरी आपले जीवन व्यतीत करीत असतात.

परंतु वाढणाऱ्या किमती आणि स्थिर असलेल्या उत्पन्नामुळे त्यांच्या दुःखात अधिकच पर पडते. म्हणून निवृत्ती वेतनधारकांना ठार करणारा म्हणून चलनविस्तागकडे बघितले जाने

HRM BUS.ECONOMICS SYBCOM

(ड) उद्योजक (Entrepreneurs) : चलनविस्ताराचा कालखंड म्हणने उद्योनकांना एक प्रकारचा सुवर्णकाळच असतो. उत्पादक, व्यापारी किंवा व्यावसायिक यांपैकी कोणत्याही वर्गातील उद्योजक असला तरी त्याचा फायदाच होत असतो. त्यांना अचानकपणे खूप माटे फायदे होत असतात. यांच्या साठ्यांच्या किमती वाढतात तसेच ज्या वेगाने वस्तूंच्या किमती वाढतात त्या वेगाने त्यांच्या उत्पादन-खर्चात लगेच वाढ होत नाही. कामगार, कच्चा माल, यंत्रसाधने व त्यांच्यावरील खर्च उत्पादनाच्या किमतीबरोबर वाढत नाही.

(इ) गुंतवणूकदार (Investors) : सामान्यपणे गुंतवणूक करणारे दोन प्रकारचे असतात : (i) भागांमध्ये (Shares) गुंतवणूक करणारे आणि (2) रोखे किंवा प्रतिभूतीसारख्या स्थिर उत्पन्न देणाऱ्या साधनांमध्ये गुंतवणूक करणारे. कंपन्यांच्या भागामध्ये गुंतवणूक करणाऱ्यांचा चलनविस्ताराच्या काळात फायदा होत असतो तर रोख्यांमध्ये गुंतवणूक करणाऱ्यांचे नुकसान होते. कारण चलनविस्ताराच्या काळात कंपन्यांचा नफा वाढत असल्याने भागधारकांना अधिक दराने लाभांश वाटला जातो तर रोख्यांमध्ये गुंतवणूक करणाऱ्यांना पूर्वीच्याच दराने व्याज मिळते. उलट वाढणाऱ्या किमतीमुळे त्यांचे वास्तव उत्पन्न कमी होते. रोख्यांमध्ये गुंतवणूक करणारे गरीब किंवा मध्यम वर्गाचे असतात तर श्रीमंत लोक कंपन्यांच्या भागामध्ये गुंतवणूक करतात. त्यामुळे चलनविस्ताराच्या काळात गरीब व श्रीमंत यांमधील अंतर वाढते.

(ई) शेतकरी (Farmers) : चलनविस्ताराच्या काळात शेतकऱ्यांचा फायदा होतो. शेतीमालाच्या किमती ज्या वेगाने वाढतात त्या वेगाने त्यांचा उत्पादन-खर्च वाढत नाही. शेतकऱ्यांच्या बाबतीतही शेतीमालाच्या वाढणाऱ्या किमती आणि त्यांचा उत्पादन-खर्च

HRM BUS ECONOMICS SYBCOM

यामध्ये अंतर पडते. मधल्या काळात शेतकऱ्यांचा फायदा होतो. शेतकरीवर्ग हा सामान्यपणे कर्जदार असतो. त्याने जर या काळात पूर्वी घेतलेल्या कर्जाची परतफेड केली तर त्याला घेतलेल्या खरेदीशक्तीपेक्षा कमी खरेदीशक्तीचा त्याग करावा लागतो. मोठे शेतकरी ज्या प्रमाणात वाढणाऱ्या किमतीचा फायदा घेतात तसा फायदा लहान शेतकऱ्यांना घेता येत नाही; कारण लहान शेतकऱ्यांकडे विक्रेय वाढावा नसतो.

(उ) सरकार (Government) : संमिश्र अर्थव्यवस्थेत सार्वजनिक क्षेत्राला बदलणाऱ्या किमतीचा परिणाम सहन करावा लागत असतो. वाढणाऱ्या किमतीमुळे सरकारला वस्तू व सेवांवर अधिक खर्च करावा लागतो. तसेच प्रकल्पासाठी लागणाऱ्या कच्च्या मालावरही अधिक खर्च करावा लागतो. एकंदरीत चलनविस्ताराच्या काळात ग्राहक, धनको, पगारी नोकरवर्ग, स्थिर उत्पन्न असणारा वर्ग, लहान प्रमाणात गुंतवणूक करणाऱ्या वर्गावर उत्पन्न व संपत्ती वितरणाच्या बाबतीत प्रतिकूल परिणाम होत असतो तर व्यावसायिक, व्यापारी, उद्योजक आणि मोठे शेतकरी यांच्या बाबतीत अनुकूल परिणाम होत असतो.

3.इतर परिणाम (Other Effects):

चलनविस्ताराचे राजकीय आणि सामाजिक परिणाम होत असतात. त्यांची तीव्रतादेखील लाक्षणिक असते. वर वर्णन केल्याप्रमाणे चलनविस्तार अन्यायकारक असतो. उत्पन्न व संपत्तीच्या पुनर्वितरणात समाजातील श्रीमंत वर्गाच्या बाबतीत चांगला परिणाम होतो तर गरिबांच्या बाबतीत वाईट परिणाम होत असतो. गरिबांच्या मनात दुःखाची भावना निर्माण होते. श्रीमंतांबद्दल त्यांना द्वेष व मत्सर वाटतो. त्यामधून आपोआप नैसर्गिकपणे समाजात सामाजिक संघर्ष निर्माण होतो. सामाजिक संघर्षातूनच राजकीय

HRM BUS.ECONOMICS SYBCOM

परिणाम निर्माण होतात. राजकीय अस्थैर्याबरोबरच व्यावसायिक नैतिकता आणि नीतिमूल्ये घसरतात. अधिक नफ्याच्या लालसेने उत्पादित वस्तूचा दर्जाही कमी केला जातो.

व्यावसायिक लोक मालामध्ये भेसळ करून समाजविघातक कृत्य करतातसर्वसाधारण नैतिकतादेखील लक्षणीयरीत्या घसरते. त्यामुळे देशात विविध क्षेत्रांमध्ये भ्रष्टाचार बोकाळतो. सामाजिक बांधीलकी घसरते. त्यामुळे देशात विविध क्षेत्रांमध्ये भ्रष्टाचार बोकाळतो. सामाजिक बांधीलकी कमी होते. एकमेकांवरचा विश्वास कमी होतो. यातूनच स्फोटक राजकीय परिस्थिती निर्माण होऊन देशामध्ये सरकारची हुकूमशाहीकडे वाटचाल सुरू होते. पहिल्या महायुद्धानंतर जर्मनीमध्ये जी चलनविस्ताराची परिस्थिती निर्माण झाली होती त्यामधूनच हिटलरसारख्या हुकूमशाहचा उदय झाला आहे. म्हणून चलनविस्तार सुलभपणे कार्यरत असलेल्या अर्थव्यवस्थेत बिघाड तर निर्माण करतोच; परंतु त्याचबरोबर प्रतिकूल सामाजिक व राजकीय परिणामही निर्माण करतो.

वरील सर्वसाधारण प्रतिकूल परिणामाव्यतिरिक्त अर्धविकसित देशांवर इतरही अनेक धोकादायक परिणाम होतात. अल्पविकसित देशांना त्यांच्या जलद आर्थिक विकासासाठी प्रचंड भांडवली साधनांची गरज असते. परंतु चलनविस्तार बचत प्रक्रियेमध्ये खंड निर्माण करत असल्याने अर्थव्यवस्थेतील भांडवलनिर्मितीची प्रक्रिया मंद होते.

HRM BUS.ECONOMICS SYBCOM

2.4 मागणी-ताणनिर्मित चलनविस्तार आणि खर्चदाबनिर्मित चलनविस्तार

DEMAND PULL INFLATION AND COST PUSH INFLATION

चलनविस्ताराचे अनेक सिद्धान्त आहेत. विषय खूपच व्यापक आहे. त्यावरील लिखाण मर्यादित आहे. त्यामुळे चलनविस्तारावरील निष्कर्षही मर्यादित आहेत. वेगवेगळ्या देशात जी चलनविस्ताराची स्थिती निर्माण होते तिचे स्पष्टीकरण करण्यामध्ये कोणताही एक सिद्धान्त पुरेसा नसल्याने चलनविस्ताराचे अनेक सिद्धान्त मांडले गेले आहेत.

HRM BUS.ECONOMICS SYBCOM

मागणी-ताणनिर्मित चलनविस्तार (Demand Full Inflation)

चलनविस्ताराच्या परंपरागत सिद्धान्तालाच मागणी ताणनिर्मित चलनविस्तार असे म्हणतात. उपलब्ध वस्तू व सेवांच्या पुरवठ्याच्या तुलनेने मागणीचे परिमाण अधिक झाल्याने किमतीमध्ये वाढ होते हे या सिद्धान्ताचे प्रमुख सार आहे. पैशाच्या पुरवठ्यातील वाढीमुळे सर्वसाधारणपणे किंमतपातळीत वाढ होते असे सनातन अर्थशास्त्रज्ञांचे मत आहे. तथापि, आधुनिक सिद्धान्तामध्ये पूर्ण रोजगार उत्पादन पातळीपेक्षा एकूण पैशाचा पुरवठा अधिक झाल्यास मागणी ताणनिर्मित चलनविस्तार निर्माण होतो. वस्तू व घटकांच्या किमती मागणी-पुरवठ्याला प्रतिसाद देतात असे हा सिद्धान्त मानतो. म्हणून जेव्हा एकूण मागणीची पातळी अधिक होते तेव्हा किमती वाढू लागतात. प्रा. फ्रिडमन, हॉट्रे आणि गोल्डन वायझर यांसारखे अर्थशास्त्रज्ञ चलनविस्तार पूर्णपणे चलनी घटना आहे असे मानतात. म्हणून ते अतिरिक्त पैशाचा पुरवठाच चलनविस्ताराला जबाबदार आहे असे

मानतात. अर्थव्यवस्थेत सार्वजनिक किंवा खाजगी गुंतवणूक प्रचंड प्रमाणावर झाल्याने एकूण पुरवठ्यावर मागणीचे आधिक्य निर्माण होते. मागणीच्या आधिक्यामुळे किमती वाढू लागतात व अतिरिक्त मागणी चलनविस्तार किंवा मागणी-ताणनिर्मित चलनविस्तार अस्तित्वात येतो. पैशाच्या पुरवठ्यातील वाढीमुळे वस्तू व सेवांच्या पुरवठ्यापेक्षा त्यांची मागणी अधिक होते. त्यामुळे किमती वाढू लागतात असे या सिद्धान्तावरून आपल्या लक्षात येते. परंतु जेव्हा भांडवलाची सीमांत लाभक्षमता वाढते तेव्हा गुंतवणूक खर्च वाढून किमती वाढू लागतात. म्हणजे पैशाच्या पुरवठ्यात वाढ न होताही मागणी-ताणनिर्मित चलनविस्तार निर्माण होतो. म्हणून चलनविषयक व राजकोषीय धोरणाच्या साहाय्याने पैशाचा पुरवठा मर्यादित ठेवून हा चलनविस्तार नियंत्रित करणे शक्य आहे. बेन्ट हॅन्सेन, लॉर्ड केन्स आणि विकसेल या अर्थशास्त्रज्ञांनी अतिरिक्त मागणीचा दृष्टिकोन पुढे विकसित केला आहे. ज्याप्रमाणे एखाद्या वस्तूची किंमत तिच्या मागणी-पुरवठ्याने ठरते त्याचप्रमाणे सर्वसाधारण किंमतपातळी वस्तू व सेवांसाठी असलेल्या एकूण मागणी-पुरवठ्याने ठरत असते. त्यांच्या मते, एकूण पुरवठ्यावर मागणीचे आधिक्य असलेली स्थिती म्हणजेच चलनविस्तार होय. सखोल अभ्यासानंतर फ्रिडमन सिद्धान्त व केन्स-हॅन्सेन यांच्या सिद्धान्तामधील फरक लक्षात येतो.

फ्रिडमनच्या मते, पैशाच्या एकूण संख्येतील अतिरिक्त वाढीमुळे मागणीचे पुरवठ्यावर आधिक्य निर्माण होते तर बेन्ट हॅन्सन व केन्स यांच्या मते, उपभोग व गुंतवणुकीवरील वाढीव खर्चामुळे मागणीचे पुरवठ्यावर आधिक्य निर्माण होते.

HRM BUS.ECONOMICS SYBCOM



आकृती क्र. 2.1 : मागणी-ताणनिर्मित चलनविस्तार

वरील आकृती क्र. 2.1 मध्ये Y, ही पूर्ण रोजगार उत्पन्न पातळी आहे. त्यामुळे पूर्ण रोजगार पातळी (Y_0) नंतर एकूण पुरवठा फलन (S) पूर्ण अलवचीक झाले आहे. Y_0 पूर्वीची कोणतीही उत्पन्न पातळी ही पूर्ण रोजगार पातळी नाही. म्हणून D. च्या पुढे मागणीमध्ये होणारी प्रत्येक वाढ किंमतपातळी वाढ घडवून आणणारी असते. आकृती क्र. 2.1 मध्ये P_0. पासून P_2 पर्यंत होणारी किंमतवाढ ही मागणी-ताणनिर्मित चलनविस्तार आहे.

खर्चदाबनिर्मित चलनविस्तार (Cost Push Inflation)

दुसऱ्या महायुद्धाच्या काळात व नंतर चलनविस्ताराचा खर्च-दाब सिद्धान्त अधिक प्रसिद्ध झाला आहे. अतिरिक्त मागणीशिवाय म्हणजे उत्पादन खर्चातील वाढीमुळेदेखील किमतीमध्ये वाढ होत असते असे या सिद्धान्तकांचे मत आहे. कच्च्या मालाच्या किमती

HRM BUS.ECONOMICS S.BCOM

किंवा मजुरीतील वाढीमुळे उत्पादन-खर्चात वाढ होत असते. काही उत्पादक किंवा कामगारांचे समूह आपल्या वस्तू किंवा सेवांच्या किमती वाढवून घेण्यामध्ये यशस्वी होत असतात. दुसऱ्या शब्दात सांगायचे झाल्यास, मागणी बाजूपेक्षा पुरवठ्याच्या बाजूने चलनविस्ताराची स्थिती निर्माण होत असते व ती संपूर्ण अर्थव्यवस्थेत पसरते. ज्या उद्योगामध्ये विक्रेते उत्पादन किमती व मजुरीचे दर ठरविण्यामध्ये अधिक परिणामकारक भूमिका पार पाडतात त्याच उद्योगामध्ये खर्च-दाबनिर्मित चलनविस्तार निर्माण होत असतो. पूर्ण स्पर्धेचे अस्तित्व असलेल्या अर्थव्यवस्थेत खर्च-दाबनिर्मित चलनविस्ताराची शक्यता कमी असते. हा चलनविस्तार खर्च व पुरवठा या दोन प्रेरणांनी निर्माण होत असला तरी तो निर्माण होणे सहज शक्य नसते. कारण राजकोषीय व चलनविषयक धोरणाच्या मदतीत तो नियंत्रित करता येतो.

पुढील आकृती क्र. 2.2 च्या साहाय्याने खर्च-दाबनिर्मित चलनविस्ताराची संकल्पना स्पष्ट करता येते.



ECONOMICS SYBCOM

आकृती क्र. 2.2 मध्ये खर्च-दाबनिर्मित चलनविस्तार कसा निर्माण होतो हे दाखविलेले आहे. अल्पविक्रेताधिकारी प्रबळ कामगार संघटना आणि इतर दबावगट असलेल्या समाजात एकूण पुरवठा वक्र S_0 वरून S_1 S_2 असा घटलेला दाखविलेला आहे. या समाजाचे एक महत्त्वाचे वैशिष्ट्य असे आहे की, वेतनदर घटकाच्या बाबतीत अलवचीक असतात. त्याच्या परिणामामुळे पुरवठा-वक्र S_0S अशा प्रकारचा राहतो.

HRM BUS.ECONOMICS SYBCOM

S_0S हा मूळ पुरवठा-वक्र आणि D_0 या मागणी-वक्राने आकृतीत दर्शविल्याप्रमाणे P_0 ही किंमतपातळी प्रस्थापित होते. वेतनपातळीत वाढ झाल्याने किंमतपातळीत वाढ होते. कामगार संघटनांच्या शक्तीमुळे व वेतन वाढून घेण्यामध्ये यशस्वी होतात. परंतु त्याच वेळेला श्रमिकांची उत्पादकता आणि मागणी यामध्ये कोणतीही वाढ झालेली नसते. वेतनपातळीत वाढ झाल्यामुळे पुरवठा-वक्र S_0S वरून S_1S असा वरच्या बाजूला स्थानांतरित होतो. वाढलेल्या वेतनदरानुसार वाढीव किंमतपातळी निश्चित होऊन शक्य उत्पादनपातळी गाठण्याचा प्रयत्न उत्पादकांकडून केला जातो. वाढलेल्या वेतनदरामुळे पुरवठा फलन S_0S वरून असा S_1S वर सरकतो आणि किंमतपातळी P_0 वरून P_1 अशी वाढते तर उत्पादनपातळी Y_0 वरून Y_1अशी कमी होते. (त्याचा परिणाम बेरोजगारी वाढण्यात होतो.) म्हणून किंमतपातळीतील वाढीबरोबर अर्थव्यवस्थेत बेकारी दिसून येऊ लागते. समजा, पुढे आणखी वेतनपातळीतील वाढ झाली तर एकूण पुरवठा-वक्र S_2S असा पुन्हा वरती सरकेल. प्रत्येक वेतनपातळीतील वाढ वाढीव किमतीला आमंत्रण देते आणि त्याच वेळेला उत्पादनपातळीत घट होते आणि एकूण बेरोजगारीत वाढ होते.

जेव्हा उत्पादन घटक एकूण उत्पादनातील आपला वाटा वाढवून घेण्याचा प्रयत्न करतात किंवा आपल्या मोबदल्यात वाढ करण्याचा प्रयत्न करतात तेव्हा निर्माण होणारा चलनविस्तार हा मागणीतील आधिक्यामुळे झालेला नसतो तर खर्चातील वाढीमुळे झालेला असतो. म्हणून या चलनविस्ताराला 'खर्च-दाबनिर्मित चलनविस्तार' असे म्हणतात. श्रमबाजारात जेव्हा मक्तेदारी असते तेव्हा मजुरीत वाढ झाल्याने किंवा वस्तूबाजारात जेव्हा मक्तेदारी असते तेव्हा नफ्यातील वाढीने हा चलनविस्तार होत असतो. परंतु मजुरीतील वाढीमुळे उत्पादन-खर्चात वाढ होते आणि त्यामुळे किंमतवाढीला चालना मिळते. म्हणून मजुरीतील वाढ हाच महत्त्वाचा घटक किंमत खर्च-दाबनिर्मित चलनवाढीला जबाबदार असतो. अलीकडच्या काळात असे आढळून आले आहे की, श्रमसंघटना अनेक देशांत बळकट झालेल्या आहेत. त्या दरश्रमिक दरताशी सरासरी उत्पादनात वाढ न होताही मजुरीचे दर वाढवून घेण्यामध्ये यशस्वी झालेल्या आहेत. एखाद्या क्षेत्रात मागणीमध्ये झालेला बदल हा चलनविस्ताराच्या प्रक्रियेचा महत्त्वाचा घटक आहे. असे खर्च-दाबनिर्मित चलनविस्तार सिद्धान्तकांचे मत आहे. उदा., लोखंड-पोलादाच्या वाढीव किमतीमुळे ट्रॅक्टरच्या किमती जेव्हा वाढतात तेव्हा शेती उत्पादनाच्या किमती वाढू लागतात. त्यामुळे पुढे वेतनदर वाढीला चालना मिळते. म्हणून एखाद्या क्षेत्रात किंवा उद्योगात खर्च-दाबनिर्मित चलनविस्ताराने गती घेतली की तो संपूर्ण अर्थव्यवस्थेत विकसित होतो.

HRM BUS ECONOMICS SYBCOM

2.5 चलनविस्ताराचे नियंत्रण

CONTROL OF INFLATION

चलनविस्ताराचे दुष्परिणाम कमी करण्यासाठी चलनविस्ताराचे नियंत्रण आवश्यक आहे. प्रभावी मागणीतील वाढ हे चलनविस्ताराचे प्रमुख कारण असते. त्यामुळे चलनविस्तार नियंत्रित करण्यासाठी लोकांची खर्च करण्याची प्रवृत्ती कमी करणे आवश्यक असते. तसेच बचतीला प्रोत्साहन द्यावे लागते. यासाठी उपाययोजना कराव्या लागतात.

चलनविस्ताराच्या नियंत्रणासाठी उपाय (Measures to Control Inflation)

1. चलनविषयक उपाय (Monetary Measures) :

चलनविषयक उपायांची कार्यवाही मध्यवर्ती बँकेमार्फत केली जाते. पैसा आणि पतपैसा नियंत्रित करणे हा या उपायांचा हेतू असतो. मध्यवर्ती बँक चलनविस्तार नियंत्रित करण्यासाठी पतसंकोचाचे धोरण स्वीकारते. पतपुरवठ्यात घट घडवून आणण्यासाठी पुढील उपाय योजले जातात :

(अ) बँकदर (Bank Rate) : "व्यापारी बँकांना त्यांच्याकडील अल्पकालीन सरासरी कर्जरोख्यांच्या तारणावर कर्ज देताना मध्यवर्ती बँक जो दर आकारते त्याला बँकदर असे म्हणतात." बँकदराला 'पुनर्वटावाचा दर' (Rediscounting Rate) असेही म्हणतात.

HRM BUS.ECONOMICS SYBCOM

"व्यापारी बँकांकडील वटविलेल्या हुंड्यांचा पुनर्वटाव करताना मध्यवर्ती बँक ज्या दराने कसर कापते त्या दराला पुनर्वटावाचा दर असे म्हणतात."

बँकदर या साधनांचा विचार कर्ज काढण्याचा खर्च या दृष्टीने केला जातो. जेव्हा मध्यवर्ती बँक चलनविस्ताराचे नियंत्रण करण्यासाठी बँकदर वाढविते तेव्हा व्यापारी बँकांचा कर्जे घेण्याचा खर्च वाढत असल्याने व्यापारीही आपल्या व्याजदरात वाढ करतात. त्यामुळे कर्जाची मागणी कमी होऊन पतनिर्मितीत घट होते. कर्जाच्या रूपाने लोकांच्या हातात पूर्वीपेक्षा कमी पैसा गेल्याने वस्तूंची मागणी व किमती कमी होऊन चलनविस्तार नियंत्रित होण्यास मदत होते.

(ब) खुल्या बाजारातील व्यवहार (Open Market Operations) : सरकारी रोख्यांची खरेदी-विक्री या साधनांचा पुरस्कार लॉर्ड केन्स यांनी केला आहे. त्यांच्या मते, हे साधन नाणेबाजारातील संघटित आणि असंघटित दोन्हीही क्षेत्रांना लागू पडत असल्याने बँकदरापेक्षा अधिक प्रभावी ठरते. या साधनाकडे पैशाचे हस्तांतर' करण्याचे साधन म्हणून पाहिले जाते.

चलनविस्ताराचे नियंत्रण करण्यासाठी मध्यवर्ती बँक सरकारी कर्जरोखे विक्रीस काढण्याचा निर्णय घेते. हे रोखे व्यापारी बँका आणि जनतेकडून खरेदी केले जातात. त्यामुळे पैशाचे हस्तांतरण व्यापारी बँका व जनतेकडून मध्यवर्ती बँकेकडे होते. व्यापारी बँकांच्या ठेवी कमी होऊन त्यांची पतनिर्मिती क्षमता कमी होते. लोकांचे पैशातील उत्पन्न कमी होते. परिणामी, मागणी व किमती कमी होण्यास मदत होते.

HRM BUS.ECONOMICS SYBCOM

(क) प्रमाणात बदल राखीव निधीच्या (Variations in Reserve Requirements) : प्रत्येक व्यापारी बँकेला आपल्याकडील एकूण ठेवींपैकी विशिष्ट टक्के रक्कम मध्यवर्ती बँकेत राखीव निधी म्हणून ठेवावी लागते. हा आवश्यक राखीव निधी (Required Reserve Ratio) पतनिर्मितीसाठी वापरता येत नाही. त्यामुळे राखीव निधीच्या प्रमाणात वाढ झाली तर व्यापारी बँकांची कर्जे देण्याची क्षमता कमी होऊन पतनिर्मिती, कर्जे, वस्तूंची मागणी व किमती यामध्ये घट होऊन चलनविस्तार नियंत्रित राहण्यास मदत होते.

(ड) अर्थव्यवस्थेतील काळा पैसा कमी करण्यासाठी चलनातील अधिकतम मूल्यांच्या नोटा रद्द केल्या जातात. त्यामुळे व्यवहारातील चलनाची संख्या कमी होते.

(इ) जुने चलन रद्द करून त्याच्या जागी नवीन चलन कमी प्रमाणात देणे. देशातील उच्च चलनविस्तार (Hyper Inflation) नियंत्रित करण्यासाठी अपवादात्मक परिस्थितीत हा उपाय केला जातो.

पतनियंत्रणाच्या संख्यात्मक साधनात बँकदर, सरकारी रोख्यांची खरेदी-विक्री व राखीव निधीच्या प्रमाणात बदल या साधनांचा समावेश होतो. निवडक पतनियंत्रणाच्या साधनांच्या साहाय्याने मध्यवर्ती बँक विशिष्ट वस्तूंचा चलनविस्तार नियंत्रित करते. पतनियंत्रणाच्या निवडक साधनांमध्ये कर्ज व तारण यामधील अंतर, ग्राहक कर्जाचे नियंत्रण, कर्जाचे वाटप, नैतिक समजावणी व प्रत्यक्ष कृती या साधनांचा समावेश होतो.

HRM BUS.ECONOMICS SYBCOM

चलनविषयक उपाययोजनांच्या उणिवा :

(1) बँकदर व राखीव निधीच्या प्रमाणात बदल तसेच पतनियंत्रणाची निवडक साधने मध्यवर्ती बँकेच्या नियंत्रणाखाली असलेल्या नाणेबाजाराच्या संघटित क्षेत्रालाच लागू पडतात. असंघटित क्षेत्राला लागू होत नाही.

(2) केन्स यांच्या मते, एकूण उत्पादन खर्चाच्या व्याजावरील खर्च अत्यंत गौण भाग असतो. त्यामुळे बँकदर हे साधन अप्रभावी ठरते.

(3) चलनविषयक उपाययोजना अप्रत्यक्षपणे कार्यवाहीत येतात. त्यामुळे त्यांची परिणामकारकता कमी असते.

(4) चलनविस्तारात नफा वेगाने वाढत असल्याने व्याजदरात वाढ होऊनही कर्जाची मागणी वाढताना दिसते.

(5) अर्थव्यवस्था विविध प्रकारच्या बंधनामुळे अलवचीक झालेली असल्याने चलनविषयक उपाययोजनांचे यश मर्यादित होते.

(6) चलनविस्ताराचे प्रभावीपणे नियंण करण्यासाठी चलनविषयक उपायांना इतर उपायांची जोड देणे आवश्यक असते.

HRMBUS.ECONOMICS SYBCOM

(7) प्रा. गालब्रेथ यांना आर्थिक तेजीच्या नियंत्रणासाठी वापरल्या जाणाऱ्या महाग पैशाच्या धोरणाच्या (Dear Money Policy) कार्यक्षमतेविषयी शंका येते. त्यांच्या मते, तेजीत किमती वाढत असल्याने भांडवलाची कार्यक्षमता व नफा उच्च राहतो. त्यामुळे बँकदरामधील वाढीचा गुंतवणुकीवर परिणाम होत नाही.

(8) प्रा. हन्सेन आपल्या 'A Study in Theory of Inflation' या पुस्तकाल चलनविस्ताराच्या नियंत्रणासाठी चलनविषयक धोरणाला दुय्यम स्थान देतात. त्यामुळे त्यांच्या मते, चलनविस्ताराच्या नियंत्रणासाठी चलनविषयक धोरणाचा अत्यंत काळजीपूर्वक वापर केला पाहिजे.

2. राजकोषीय उपाय (Fiscal Measures) :

या उपाययोजनांना 'अंदाजपत्रकीय' किंवा 'वित्तीय उपाययोजना' असेही म्हणतात. त्यांची कार्यवाही सरकारकडून अंदाजपत्रकाद्वारे होते. कर, सार्वजनिक खर्च आणि सार्वजनिक कर्जे यांचा या उपाययोजनात समावेश होतो. सन 1929-30 च्या जागतिक महामंदीचे नियंत्रण करण्यासाठी केन्स यांनी या उपाययोजनांचा पुरस्कार केला होता.

(अ) कर (Taxes): आयकरासारख्या प्रत्यक्ष कराचे दर वाढवून व्ययशक्य उत्पन्नात घट घडवून आणली जाते. त्यामुळे वस्तूंची मागणी व किमती कमी होण्यास मदत होते . उपभोग-खर्चावर खर्च-कर नव्याने आकारला जातो किंवा जुन्या खर्च-करांचे दर वाढविले जातात. बचतीला उत्तेजन मिळावे यासाठी बचतीला कर सवलती दिल्या जातात.

HRM BUS.ECONOMICS SYBCOM

(ब) सार्वजनिक खर्च (Public Expenditure) : चलनविस्तार नियंत्रित करण्यासाठी सरकार सार्वजनिक खर्चात कपात करते. त्यामुळे सरकारी खर्चाच्या रूपाने लोकांच्या हातात पूर्वीपेक्षा कमी पैसा जातो. लोकांचे उत्पन्न कमी होऊन वस्तूंची मागणी व किमती कमी होतात.

(क) सार्वजनिक कर्जउभारणी (Public Debt) : चलनविस्तार नियंत्रित करण्यासाठी सरकार अंतर्गत कर्ज घेते. त्यामुळे जनतेकडून सरकारकडे पैशाचे हस्तांतर होते. लोकांजवळील पैसा कमी होऊन मागणी व किमती कमी होण्यास मदत होते.

अशा प्रकारे सरकार कर-उत्पन्नापेक्षा खर्च कमी करत असल्याने अंदाजपत्रकात शिल्लक निर्माण होते. परंतु आर्थिक विकासाच्या उद्दिष्टाला अधिक महत्त्व दिल्यामुळे तेजी असूनही अनेक देशात अंदाजपत्रकातील तूट वाढत आहे.

राजकोषीय उपाययोजनांवरील मर्यादा :

(1) आयकराचे दर खूप जास्त वाढविले तर त्यामुळे बचत, गुंतवणूक व उत्पादनावर अनिष्ट परिणाम होतात. त्यामुळे करांचे दर वाढविण्यावर मर्यादा पडतात.

HRM BUS.ECONOMICS SYBCOM

(2) चलनविस्तारात विक्री कर, जकात कर व उत्पादन कर यांसारखे अप्रत्यक्ष कर वाढविले तर किमतीत आणखी वाढ होते. कारण अप्रत्यक्ष कर किमती वाढवून ग्राहकांकडून वसूल केले जातात.

3() चलनविस्तार नियंत्रित करण्यासाठी अनुत्पादक सरकारी खर्चात कपात करणे योग्य असते. उत्पादक खर्चात कपात केली तर त्यामुळे उत्पादनात घट होऊन महागाईची तीव्रता वाढेल.

(4) सार्वजनिक कर्जाच्या उभारणीतून मिळालेला पैसा सरकारने पूर्वीची कर्जे परत करण्यासाठी वापरला तर चलनविस्ताराचे नियंत्रण अशक्य होईल.

(5) चलनविस्ताराच्या प्रभावी नियंत्रणासाठी वित्तीय उपायांना इतर उपायांची जोड देणे आवश्यक असते.

3. इतर उपाययोजना : इतर उपाययोजनांमध्ये पुढील उपायांचा समावेश होतो :

(अ) किंमत नियंत्रण : सरकार वस्तूंच्या किमती ठरवून देते. त्यापेक्षा अधिक किमतीला वस्तू विकणे गुन्हा समजला जाऊन त्यावर कारवाई केली जाते. परंतु किंमत नियंत्रण यशस्वी होण्यासाठी सरकार कठोर असावे लागते.

HRM BUS.ECONOMICS SYBCOM

(ब) कडक कारवाई : सरकारने साठेबाजी व काळा बाजार यांच्या विरुद्ध कडक कारवाई केली तर वस्तूंच्या कृत्रिम टंचाईला आळा बसतो. परंतु त्यासाठी सरकार प्रामाणिक असावे लागते.

(क) नियंत्रित दर : सार्वजनिक वितरण व्यवस्थेद्वारे जीवनावश्यक वस्तूंचे नियंत्रित दराने वाटप केले तर अशा वस्तूंची खुल्या बाजारातील मागणी कमी होऊन बाजारभाव कमी होण्यास मदत होते.

(ड) आयात वाढ निर्यात घट : उपभोग्य वस्तूंच्या किमती नियंत्रित करण्यासाठी सरकार अशा वस्तूंची परकीय देशातून आयात करते. त्याचप्रमाणे उपभोग्य वस्तूंच्या निर्यातीवर निर्बंध लादले जातात. त्यामुळे उपभोग्य वस्तूंची देशातील टंचाई कमी होण्यास मदत होते.

(इ) वेतनविषयक उपाययोजना : सरकार कर्मचाऱ्यांची वेतनवाढ रोखणे, वाढीव महागाई भत्ता गोठविणे, कमी दराने वाढीव महागाई भत्ता देणे, वाढीव महागाई भत्त्याचा फरक नाकारणे, सक्तीची बचत योजना व काही काळ बचत खाते गोठविणे इत्यादी उपाययोजनांद्वारे कर्मचाऱ्यांना मिळणारे उत्पन्न नियंत्रित करते. परंतु त्यामुळे कर्मचाऱ्यांचा सरकारला तीव्र विरोध होतो. हा विरोध लोकशाहीत निवडणूक लढवाव्या लागणाऱ्या सरकारला परवडणारा नसतो.

HRM BUS.ECONOMICS SYBCOM

(ई) उत्पादन वाढ : पुरवठ्याची टंचाई कमी करण्यासाठी सरकार उत्पादनवाढीला प्रोत्साहन देते. त्यासाठी कर सवलती, आर्थिक मदत व मोफत जागा इत्यादींसारख्या सवलती उत्पादकांना दिल्या जातात.

अशा प्रकारे विविध उपाययोजना करून सरकार चलनविस्ताराचे नियंत्रण करण्याचा प्रयत्न करते.

चलनविस्तार फक्त देशी भांडवलनिर्मितीची प्रक्रिया मंद करतो असे नाही तर परदेशातून येणाऱ्या भांडवलाच्या प्रवाहावर प्रतिबंध घालतो. म्हणून कमी झालेल्या भांडवल संसाधनामुळे अर्धविकसित देशांना आर्थिक विकास साधणे अवघड होते. चलनविस्तार उत्पादकांच्या वस्तू उत्पादन करण्याच्या इच्छेवरही प्रतिकूल परिणाम करतो. कारण उत्पादकांना मालाची साठेबाजी करून किंवा काळाबाजार करून त्यांना अधिक नफा मिळविता येतो.

2.6 मंदीयुक्त चलन-अतिवृद्धी -अतिवृद्धी : अर्थ आणि कारणे

STAGFLATION : MEANING AND CAUSES

पूर्वी भांडवलशाही देशात केवळ तेजी किंवा मंदी अशा दोन अवस्था परिचित होत्या. अतिरिक्त बचत, प्रभावी मागणी, गुंतवणूक यातील घटक, बेरोजगारीत वाढ, राष्ट्रीय उत्पन्न किमान पातळीवर येणे ही लक्षणे मंदीची असत. किंमतपातळीत प्रचंड घसरण होऊन ही मंदी निर्माण होत असे तर आर्थिक भरभराटीमधून तेजीकडे अर्थव्यवस्थेचे स्थित्यंतर होत

HRMBUS.ECONOMICSSYBCOM

असे. तेजीच्या परिस्थितीत किंमतपातळीत वाढ होऊन गुंतवणूक प्रभावी मागणीत मोठी वाढ होत असे. त्यातून बेरोजगारीचे प्रमाण अत्यल्प होऊन उत्पादनपातळीत म्हणजेच राष्ट्रीय उत्पादनात वाढ होत असे. पूर्ण रोजगारानंतर राष्ट्रीय उत्पन्नात फक्त चलनी स्वरूपाची वाढ होत असे. अशी ही तेजीची स्थिती होती.

केन्स यांच्या मतानुसार, खरी चलन अतिवृद्धी ही पूर्ण रोजगार पातळी गाठल्यानंतर सुरू होते. कालांतराने आधुनिक अर्थशास्त्रज्ञांनी असे मान्य केले की, पूर्ण रोजगार पातळी अस्तित्वात येण्यापूर्वीच चलन अतिवृद्धी किंवा भाववाढ सुरू होऊ शकते; पण त्याचबरोबर या अर्थशास्त्रज्ञांची अशी श्रद्धा होती की, मागणी व्यवस्थापनाचे योग्य उपाय योजून अशी चलन अतिवृद्धी काबूत ठेवता येईल. प्रत्यक्ष व्यवहारात सन 1950 ते 1970 या काळात उत्तर अमेरिकेतील आणि पश्चिम युरोपातील देश तसेच जपान या देशांच्या अर्थव्यवस्थांची योग्य व निकोप आर्थिक वाढ होत गेली. यावरून लोकांना असे वाटते की, त्यांच्या प्रश्नांची उत्तरे अर्थशास्त्रज्ञांना गवसलेली असून चलन अतिवृद्धी किंवा बेकारी यांचा यत्किंचितही कलंक लागू न देता आर्थिक अभिवृद्धीचे रहस्य ते सांगू शकतात. पण हे समाधान फार काळ टिकले नाही. परंतु सन 1970 पासून मात्र भांडवलशाही देशांनी एकाच वेळी तेजी व मंदीची स्थिती अनुभवली. किमतीच्या संदर्भात तेजी होती तर त्याच वेळी उत्पादन खर्चात प्रचंड वाढ झाल्याने गुंतवणुकीची लाभक्षमता घटली होती. परिणामी, गुंतवणूक घटून बेरोजगारीत वाढ झाली. उत्पादनपातळी घटली अशी ही किमतीच्या संदर्भात तेजी आणि रोजगार व उत्पादनाच्या संदर्भात मंदी एकाच वेळी निर्माण झाली; यालाच 'मंदीयुक्त चलन अतिवृद्धी' (Stagflation) असे नाव देण्यात आले.

(म्हणजेच Stagnation + Inflation = Stagflation)

HRM BUS ECONOMICS SYBCOM

मागणी-ताणनिर्मित चलनवाढ आणि खर्च-दाबनिर्मित चलनवाढ या दोन प्रकारात मागणी-ताणनिर्मित चलनवाढीत किंमतवाढ होताना अर्थव्यवस्थेतील बेकारीत घट होते आणि उत्पादनात वाढ होते. परंतु खर्च-दाबजन्य चलनवाढीला किंमतवाढ होत असताना रोजगार आणि उत्पादन या दोहोंतही घट होते. त्यातूनच किमतीबाबत तेजी तर उत्पादनाबाबत मंदी निर्माण होते.

सन 1970 नंतर बऱ्याच देशांनी या स्थितीचे वर्णन मंदीयुक्त चलनवाढ म्हणजेच बेकारी आणि तेजीचे सहअस्तित्व असे केले आहे.

मंदीयुक्त चलनवाढीविषयी असणाऱ्या कारणांचे वेगवेगळे दृष्टिकोन पाहावयास मिळतात, ते पुढीलप्रमाणे :

(1) मंदीयुक्त चलनवाढीचे पुरवठ्याच्या बाजूचे कारण म्हणजे अर्थव्यवस्थेतील एकूण पुरवठ्याचे अयोग्य व्यवस्थापन हे होय. जर एकूण पुरवठ्याचा संकोच झाला तर आपोआपच उत्पादन व रोजगार कमी होऊन किमतीत वाढ होते तीच 'मंदीयुक्त चलनवाढ' होय.

(2) दुसरे कारण म्हणजे सरकारच्या अनुत्पादक खर्चातील वाढ होय. त्यामुळे उत्पादन व रोजगार न वाढता फक्त किंमतपातळीत वाढ होते. त्यालाच 'मंदीयुक्त चलनवाढ' असे म्हणतात.

HRM BUS.ECONOMICS SYBCOM

(3) अर्थव्यवस्थेत कार्यरत असलेले 'दबाव गट'देखील (Pressure Groups) मंदीयुक्त चलनवाढीला कारणीभूत असतात. उदा., दबाव गटाने जास्त वेतनवाढीची मागणी केली तर किंमतपातळी वाढते आणि उत्पादन क्षेत्रात भांडवलप्रधान तंत्राचा वापर वाढत जातो. म्हणून कामगारांची बेकारी वाढते. यांचा एकत्रित परिणाम अर्थव्यवस्थेत मंदीयुक्त चलनवाढीचा दाब निर्माण होतो.

(4) तसेच इतरही कारणे सांगता येतील. उदाहरणार्थ, तेलाच्या वाढणाऱ्या किमती, औद्योगिक व आर्थिक विकासात रोजगार संधी पुरविण्याची असमर्थता, औद्योगिक मागासलेपणा इत्यादींचा परिणाम बेकारी चलनवाढ वाढण्यात होतो.

अशा प्रकारे मंदीयुक्त चलनवाढीची कारणे देता येतील. तसेच जर मंदीयुक्त चलनवाढ नियंत्रित करावयाची असेल तर वेगवेगळ्या उपाययोजना करता येतील. त्यात पारंपरिक व नवीन धोरणात्मक पर्यायांचा विचार करता येईल. उदाहरणार्थ, चलनविषयक धोरण, राजकोषीय धोरण, वेतनविषयक व उत्पन्नविषयक धोरण, किंमतविषयक धोरण, रोजगारविषयक धोरण इत्यादी धोरणांचा विचार करता येईल.

HRM BUS.ECONOMICS SYBCOM

पुढील आकृती क्र. 2.3 वरून 'मंदीयुक्त चलनवाढीची' संकल्पना अधिक स्पष्ट होईल.



उत्पादन व रोजगारपातळी

आकृती क्र. 2.3 : मंदीयुक्त चलनवाढ

वरील आकृती क्र. 2.3 मध्ये OX अक्षावर उत्पादन व रोजगार पातळी तर OY अक्षावर किंमतपातळी दर्शविलेली आहे. आकृतीचे स्पष्टीकरण पुढीलप्रमाणे :

(1) वरील आकृतीत AD_1 एकूण मागणी आणि AS_1 एकूण पुरवठा यावरून OQ_1 हे उत्पादन आणि OP_1ही किंमत दिसते. (E_1 हा समतोल बिंदू असताना)

HRM BUS.ECONOMICS SYBCOM

(2) जेव्हा मागणी AD_1 वरून AD_1 इतकी वाढते म्हणजे वक्र पुढे स्थानांतरित होतो. परंतु पुरवठ्याच्या बाजूच्या अर्थशास्त्रज्ञांच्या मते पुरवठा AS_1 वरून मागील बाजूस AS_2 या ठिकाणी स्थानांतरित होतो. समतोल बिंदू E_1 असताना OQ_1 ही उत्पादनपातळी निश्चित होते. ती पूर्वीपेक्षा संकोचते त्याच वेळी किंमत मात्र OP_1 पासून OP_2 पर्यंत वाढताना दिसते.

(3) यावरून असे दिसते की, एकाच वेळी किंमत OP_1 पासून OP_2 पर्यंत वाढते (चलनवाढ) आणि उत्पादनपातळी OQ_1 पासून OQ_2 पर्यंत घटते. म्हणजेच रोजगारपातळी कमी होते किंवा बेकारी वाढते.

ही किमतीतील वाढ आणि त्याच वेळी उत्पादनात म्हणजेच रोजगारात होणारी घट हे दुसरे काहीही नसून 'मंदीयुक्त चलनवाढ' (Stagflation) आहे.

HRM BUS.ECONOMICS SYBCOM

प्रश्न .

1. (अ) रिकाम्या जागी कंसातील योग्य पर्याय वापरून विधाने पूर्ण करा

1. चलनविस्तार ही अशी अवस्था आहे की, ज्यामध्ये पैशाच्या मूल्यात --------------होते. (वाढ/घट/स्थिर)
2. चलनविस्तार आणि भाववाढ या दोघांचाही अर्थ -----------------आहे. (समान/वेगवेगळा)
3. मागणीमध्ये ------------. झाल्यास भाववाढ घडून येते. (घट/वाढ)
4. पुरवठ्यात . झाल्यास भाववाढ घडून येते. भाववाढीमुळे (घट/वाढ)

5. उत्पादकांवर . . . . ------. पगारी नोकरवर्गाच्या राहणीमानावर चलनविस्ताराचा परिणाम होतो (चांगला/वाईट)

7. कामगारांच्या वेतनातील वाढ हे --------------चलनविस्ताराचे एक कारण आहे. (मागणी-ताणनिर्मित चलनविस्तार/खर्च-दाबनिर्मित चलनविस्तार)

HRM BUS.ECONOMICS SYBCOM

संदर्भसूची

2.व्यवसायिक अर्थशास्त्र (समग्रलक्षी)पब्लिकेशन प्रा. डॉ.राजेंद्र अ.रसाळ जून 2020.